मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कर संकलन विभागाची दमदार कामगिरी सुरूच!

## ४ लाख २१ हजार मालमत्ता धारकांनी भरला कर

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाची दमदार कामगिरी सुरूच असून दहा महिन्यात तब्बल ७०० कोटी रूपयांचा टप्पा पार केला आहे. उर्वरित दोन महिन्यात जास्तीत-जास्त कर वसूल करण्यासाठी विभागाने आता थकबाकीदारांच्या मालमत्ता जिथे सील करता येणे शक्य नाही त्या ठिकाणी जप्त' करण्याचा प्रथमच मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी मालमत्ता जप्त होऊ नये, यासाठी त्वरित कर भरून पालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख १५ हजार मालमत्ता आहेत. यापैकी तब्बल ४ लाख २१



हजार मालमत्ता धारकांनी ७१६ कोटी ४० लाख रूपयांचा भरणा करून शहर विकासात योगदान दिले आहे. त्याबद्दल पालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी या जबाबदार आणि जागरूक करदात्यांचे मनस्वी आभार मानले आहेत. जनजागृती, वारंवार आवाहन, जप्ती पूर्व नोटीस, मोबाईलवर एसएमएस पाठवून थकबाकीदारांना कर भरण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही कर न भरणा-या मालमत्ता धारकांबाबत कठोर पाऊले उचलण्यास कर संकलन विभागाने सुरूवात केली आहे. शहरात थकबाकीदारांमध्ये रहिवाशी मालमत्तांची संख्या मोठी आहे. अशा मालमत्ता धारकांना पाच वेळा भेटी देऊन कर भरण्याबाबत सूचना केल्या, मालमत्ता जप्त होण्याचा इशारा दिला. त्यानंतरही थकबाकीदार नागरिक कर भरण्यास प्रतिसाद देत नाहीत. वास्तविक मानवतेच्या दृष्टीकोनातून रहिवाशी सदनिका महापालिका सील करत नाहीत. मात्र, आता यापुढे अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यात येणार आहे. मात्र ही जप्ती मालमत्ता सिल न करता किंवा कुठलीही जंगम मालमत्ता जप्त न करता केली जाणार आहे. त्यासाठी सदर मालमत्तेवर जप्ती अधिपत्र डकवले जात आहे. रहिवास करत असलेले थकबाकीदार आर्थिक क्षमता असूनही कुठल्याही पाठपुराव्याला प्रतिसाद देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा रहिवाशी मालमत्तांकडे जवळपास ३०० कोटीच्या वर थकबाकी आहे. यापूर्वी बंद असलेल्या रहिवाशी सदनिका बंद असल्याने सील केल्या होत्या. गत वर्षी त्यांची संख्या ७० च्यावर होती. यावर्षी अशा जप्त केलेल्या मालमत्तांची संख्या १०० च्यावर गेली आहे आणि ही कारवाई ३१ मार्चपर्यंत चालू राहणार आहे. ५० हजार रुपयांहून अधिक थकबाकी असलेल्या २२ हजार मालमत्तांची जप्ती अधिपत्र काढण्यात आली आहेत. ८ हजार अधिपत्राची अंमलबजावणी केली आहे. उर्वरित १४ हजार अधिपत्रांची ३१ मार्चपर्यंत शंभर टक्के अंमलबजावणी केली जाणार आहे. यासाठी कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी सूक्ष्म नियोजन केले आहे. त्यानुसार प्रत्येक झोनला निवासी, बिगर निवासी किती जप्त्या करायच्या, नळजोड किती खंडित करायचे, यांचे दैनंदिन उदिष्ट ठरवून देण्यात आले आहे. त्याचबरोबर टेलिकॉलिंग किती करायचे, यांचे नियोजन केले आहे. टेलिकॉलिंगच्या माध्यमातून जवळपास दररोज चार हजार थकबाकीदारांना फोन केले जात आहेत. याचाही कर संकलन विभागाला मोठा फायदा होत आहे.

# रक्तदानासह आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## मोशी प्राधिकरण परिसरातील विधायक उपक्रम

**मोशी**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. त्यानुसार मोशी प्राधिकरण परिसरात रक्तदान शिबिर घेण्यात आले. ११० दात्यांनी रक्तदान केले. तर पाचशे नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेतली. या शिबिरास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन्ही शिबिराचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते तुषार सहाणे यांच्यातर्फे करण्यात आले होते. डॉ. डी.वाय.पाटील ब्लड बँक यांच्या सहाय्याने गुरुविहार कॉलनी येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. तर डॉ. प्रवीण बढे यांचे आरोग्य शिबिर



इंद्रायणीनगरमध्ये सहारा स्वीट जवळ घेण्यात आले. तसेच युनिकेअर हेल्थ सेंटर त्रिवृक्ष संगम दत्त मंदीर सेक्टर ६ मोशी प्राधिकरण या ठिकाणीही आरोग्य शिबिर घेण्यात आले. शहरी भागांत प्रत्येक नागरिक घड्याळाच्या काट्यावर पळतो आहे. कामाच्या व्यस्ततेत स्वतः च्या आरोग्याची काळजी घेतली जात नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. तसेच रक्तपेढ्यांना रक्ताची सातत्याने गरज असते, हेच लक्षात घेऊन रक्तदान शिबिर घेतले. दात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, असल्याचे सामाजक कार्यकर्ते तुषार सहाणे यांनी सांगतले. रक्तदान हेच जीवनदान, रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असे समजले जाते. त्यानुसार मोशी प्राधिकरण परिसरात रक्तदान शिबिर घेण्यात आले. ११० दात्यांनी रक्तदान केले.

# भाजपाचे ४ फेब्रुवारीपासून 'गाव चलो अभियान'

## लोकसभेच्या ४५ हून अधिक जागा जिंकण्यासाठी भाजपाची तयारी




**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा सरकारने गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक उन्नती आणि जगामध्ये भारताचा गौरव वाढविण्यासह विकासाच्या सर्व आयामांवर अतुलनीय कार्य केले आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाची विकासाची दृष्टी गरीबांच्या कल्याणाकडे घेऊन आणि सरकारने केलेली विकासकामे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांच्या निर्देशानुसार गाव चलो अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत देशभरातील ७ लाख बूथवर कार्यकर्ते २४ तास कार्यरत राहणार आहेत. या अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बळ देण्यासाठी येत्या ४ ते ११ फेब्रुवारीदरम्यान पिंपरी चिंचवड शहरामध्ये गाव चलो अभियान बूथ पातळीवर सुरुवात करण्यात येत आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी दिली आहे.आज भाजपा शहर कार्यालय, पिंपरी येथे जिल्हा पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. यावेळी, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'गाव चलो अभियान' राबविण्यात येणार असल्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच, अभियान संयोजक भाजपा सरचिटणीस विलास मडिगेरी, चिंचवड विधानसभा सहसंयोजक सिध्देश्वर बारणे, पिंपरी विधानसभा सह संयोजक महेंद्र बाविस्कर, भोसरी विधानसभा सह संयोजक पोपट हजारे यांची निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर, दि.१ फेब्रुवारी रोजी तीनही विधानसभा निहाय कार्यशाळा आयोजित करून अभियानाबाबत नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी ठरविण्यात आले. बैठकीवेळी, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे, चिंचवड विधानसभा आमदार आश्विनी जगताप, सरचिटणीस विलास मडिगेरी, नामदेव ढाके, अजय पाताडे, संजय मंगोडेकर, शैला मोळक, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा प्रवक्ता राजू दुर्गे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, प्रदेश युवा मोर्चा सरचिटणीस अनुप मोरे, उपाध्यक्ष माऊली थोरात, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते आदी पदाधिकारी उपस्थित होते. सर्वोच्च नेतृत्वाच्या सूचनेनुसार ४ ते ११ फेब्रुवारीदरम्यान गाव चलो अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानादरम्यान भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते २४ तास बूथ स्तरावरील बैठकीपासून ते घरोघरी जाऊन लोकांशी संवाद साधतील. त्याद्वारे सरकारच्या योजनांची माहिती देखील नागरिकांना देतील. त्यानुसार, प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. प्रत्येक बुथ वर कार्यकर्ते भेट देवून ते बूथ स्तरावरील बैठका घेतील. यानंतर २४ तासांच्या मुक्कामात नागरिकांसोबत संवाद साधतील, असे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले.

> **“आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने राज्यातील ४५ हून जागा जिंकण्याची रणनीती आखली आहे. भाजप पक्षातर्फे लोकसभेची निवडणूक तयारी जोमाने सुरु आहे. पुणे जिल्हयातील मावळ, शिरूरसह चारही जागा भाजपच जिंकणार आहे. या अभियानाची रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे. पक्षातर्फे 'गाव चलो अभियान' सुरू करण्याचे ठरविण्यात आले असून पक्षाचे सर्व कार्यकर्ते बूथ पातळीवर प्रचार करतील. गाव चलो अभियानाच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते प्रत्येक बूथवर विस्तारक म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या १० वर्षातील योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवतील.**
>
> **– शंकर जगताप, शहराध्यक्ष**
>
> **– भाजपा पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा)**

# दानवे यांच्या हस्ते उद्या पुणे-लोणावळा लोकलचे उद्घाटन

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्याला यश



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** लोणावळा ते पुणे दरम्यान धावणाऱ्या लोकलचे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्या बुधवार (दि.३१) उद्घाटन होणार आहे. लोणावळा रेल्वे स्थानक येथे दुपारी अडीच वाजता उद्घाटन होणार आहे. दानवे ऑनलाइन हिरवा झेंडा दाखविणार आहेत. मावळचे खासदार श्रीरंग बारणे हे देखील ऑनलाइन उपस्थित असणार आहेत. याबाबतची माहिती मंडल रेल प्रबंधक इंदू दुबे यांनी दिली.कोरोना साथ सुरु होण्यापूर्वी पुणे-लोणावळा दरम्यान लोकल गाड्यांचे संचालन व्यवस्थित सुरु होते. कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली. कोरोनानंतर आता देशात पूर्वीप्रमाणे सर्व रेल्वे सुरु झाल्या आहेत. कोरोना साथीच्या अगोदर पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत दोन लोकल गाड्या चालवल्या जात होत्या. त्या गाड्यांचे संचालन बंद होते. साडे दहा ते अडीच या वेळेत लोकल सेवा बंद होती. दुपारच्या वेळेत रेल्वे सुरू करण्याची मागणी खासदार बारणे यांनी संसदेत, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे सातत्याने केली होती. अखेरिस खासदार बारणे यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, लोणावळा ते पुणे दरम्यान लोकल उद्यापासून सुरू होणार आहे.

# नियम मोडणाऱ्याचा परवाना होतोय रद्द

## दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील वाहतुकीची शिस्त दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी एक हजारहून अधिक वाहनचालकांचे परवाने ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई झाली आहे.वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ही कारवाई झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते. आरटीओकडून परवाना निलंबित करण्यात आल्याची माहिती संबंधित वाहनचालकाला ऑनलाइन दिली जाते. परवाना निलंबनाच्या कालावधीत चालक वाहन चालविताना आढळल्यास त्याच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करून त्यांचे वाहनही जप्त केले जाऊ शकते.वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ही कारवाई झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते. शहरातील वाहतुकीची शिस्त दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी एक हजारहून अधिक वाहनचालकांचे परवाने ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई झाली आहे. गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.वमद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते.



**“बेशिस्त वाहनचालकांवर परवाना निलंबनाची कारवाई केली जाते. निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना पुन्हा वाहन चालविता येते. यात केवळ मद्यप्राशन करून वाहन चालविण्याच्या गुन्ह्याचा अपवाद आहे. त्यांना वाहनाची तंदुरुस्ती तपासणी आणि वाहन चालविण्याची चाचणी पुन्हा द्यावी लागते. त्यानंतर त्यांना पुन्हा परवाना मिळू शकतो.**

**– संजीव भोर,**
**प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी**

**“वाहतूक नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांवर अंकुश राहावा, यासाठी परवाना निलंबित करण्याची शिफारस वाहतूक पोलिसांनी आरटीओकडे केली होती. तीन ते चार वेळा नियमभंग करणाऱ्यांवर ही कारवाई प्रामुख्याने करण्यात आली आहे. परवाना निलंबित झाल्यानंतर संबंधित व्यक्तीला त्या कालावधीत वाहन चालविता येत नाही.**

**– शशिकांत बोराटे,**
**पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा**

# पुणे लोकसभेसाठी रवींद्र धंगेकरांचं नाव आघाडीवर

## कसबा पोटनिवडणुकीवेळची जादू लोकसभेतही होणार का?

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागलेत. अनेक दौरे, चर्चा, बैठकीनंतर आता उमेदवार निश्चित होत आलेत. राज्यातील सर्वच जागांसाठी महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यामध्ये रस्सीखेच पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या मतदारसंघावर अनेक पक्षांनी दावा सांगायला सुरुवात केली आहे. यामध्ये महाविकास आघाडीतर्फे कुठला उमेदवार देण्यात येईल याची उत्सुकता होती. कसबा विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर हे गेल्या काही दिवसांपूर्वी पुणे शहर लोकसभेचे उमेदवार म्हणून इच्छुक असल्याच्या चर्चा सुरू आहेत. महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकर हेच नाव सध्या आघाडीवर आहे. काँग्रेसचे कसबा विधानसभेचे आमदार रवींद्र धंगेकर २०२३ मध्ये कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत



भाजपच्या हेमंत रासने यांचा पराभव करत विजयी झाले. माजी आमदार मुक्ता टिळक यांच्या निधनानंतर कसबा पेठेतील जागा रिक्त झाली होती. कसबा पेठ भाजपचा बालेकिल्ला असून रवींद्र धंगेकर यांनी कसबापेठ पोटनिवडणुकीत बाजी मारली. महविकास आघाडीकडून काँग्रेसचे कसबा पेठ विधानसभा आमदार रवींद्र धंगेकर यांचे नाव आघाडीवर आहे. विधानसभा आणि लोकसभा या दोन्ही निवडणुकांमध्ये मोदी लाटेनंतर काँग्रेसला आहोटी लागली. २०१४ आणि २०१९ मध्ये सर्वाधिक भाजप महायुतीने जागा जिंकल्या होत्या. मात्र २०२३ मध्ये झालेली कसबा विधानसभा पोटनिवडणूक रंगतदार आणि प्रतिष्ठेची झाली होती. काँग्रेसचे रवींद्र धंगेकर विरुद्ध भाजपचे हेमंत रासने अशी ही निवडणूक झाली. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांनी हजेरी लावली, प्रचार सभा घेतल्या आणि रवींद्र धंगेकर त्यांचे काम आणि लोकप्रियतेमुळे विजयी झाले. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून मोठ्या प्रमाणात ताकद लावण्यात आली होती. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून देखील सभा घेतल्या जात होत्या. सन २०१४ आणि २०१९ च्या मोदी उदयानंतर काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांचं इतक्या मोठ्या मताधिक्याने जिंकून येणं हा काँग्रेस आणि आघाडीसाठी मोठा विजय होता.

# बारणे की पवार? कोणाला उमेदवारी

## तो ठाकरेंची मशाल घेऊन रणांगणात उतरणार!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील सत्ता संघर्षानंतर लोकसभा निवडणुकांची परिस्थिती बदललीये. मावळ लोकसभेतही याचे पडसाद जाणवतायेत. महायुतीचे उमेदवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणेचं असतील हे जवळपास निश्चित मानलं जातंय. विद्यमान खासदार शिंदे गटाचा असल्यानं आगामी लोकसभेच्या जागावाटपात ही जागा त्यांनाच सुटेल, असं महायुतीचे नेते सूतोवाच देतायेत. पण महाविकासआघाडीचा उमेदवार कोण असणार? उद्धव ठाकरेंची (िंववहर्री ेिंहरलज्ञशअॅर) शिवसेना की शरद पवारांची राष्ट्रवादी, कोणाला ही जागा सुटणार? खासदार श्रीरंग बारणेंची हॅट्रिक रोखणारा तुल्यबळ उमेदवार त्यांच्याकडे आहे का? असे अनेक प्रश्न आगामी मावळ लोकसभेच्या अनुषंगाने मावळ लोकसभेत उभे ठाकलेले आहेत. लोकसभा २०१९च्या निवडणुकीवेळी शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत झाली होती. तेंव्हा श्रीरंग बारणेंच्या बाणाने घड्याळाच्या काट्यांना भेदत, अजित पवारांचे पुत्र पार्थ पवारांना अस्मान दाखवलं होतं. पण सध्या हे दोन्ही गट सत्तेच्या हव्यासापोटी गळ्यात गळे घालून बसलेत. त्यामुळं महायुतीकडून श्रीरंग बारणे की पार्थ पवार? नेमकी कोणाला उमेदवारी मिळणार? अशी उत्सुकता सर्वांना लागलेली आहेचं. पण अलीकडे महायुतीचे नेते जे सूतोवाच देतायेत, यावरून तरी श्रीरंग बारणे उमेदवार असतील हेच निश्चित मानलं जातंय. महायुतीचा धर्म खऱ्या अर्थाने पाळला गेला तर सध्या बारणेंसाठी इथली परिस्थिती अनुकूल आहे. कारण कागदावर तरी मावळ लोकसभेत महायुती भक्कम स्थितीत दिसतेय. त्या तुलनेत महाविकासआघाडीची परिस्थिती बिकट आहे, असंच म्हणावं लागेल. यात सुधारणा करण्यासाठी उद्धव ठाकरेंनी थेट अजित पवारांना मोठा धक्का दिला. पिंपरी चिंचवडमधील अजित पवारांचे विश्वासू आणि माजी महापौर संजोग वाघेरेंना ठाकरेंनी शिवबंधन बांधलं. आपल्याला मावळ लोकसभेवर पुन्हा आपलाच भगवा फडकवायचा आहे, यासाठी वाघेरे मी तुमच्यावर जबाबदारी सोपवत आहे. असं म्हणत उद्धव ठाकरेंनी वाघेरेचं महाविकासआघाडीचे उमेदवार असतील, याचे स्पष्टपणे संकेत दिले. पण वाघेरेंचा आजवरचा राजकीय प्रवास पाहता ते स्वतःहून शिवसेनेत दाखल झालेत की या मागे आणखी कोणाचा हात आहे? याबाबत चर्चा सुरूच आहे. साहजिक हा हात म्हणजे शरद पवारांचाच मानला जातोय. म्हणूनच महाविकासआघाडीत ही जागा ठाकरेंच्या शिवसेनेला सोडली जाणार आणि त्याचअनुषंगाने हे डावपेच सुरू असल्याचे दिसून येतंय. मावळ लोकसभेतील या राजकीय घडामोडी पाहता श्रीरंग बारणे विरुद्ध संजोग वाघेरे अशीच लढत होईल, असं सध्याचं चित्र आहे. यानिमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध उद्धव ठाकरे असा सामना झालाचं तर कोणाचं पारडं जड असेल हे पाहणं महत्वाचं राहील. पुणे आणि रायगड जिल्ह्याला जोडणारा हा मावळ लोकसभा मतदारसंघ आहे. पिंपरी, चिंचवड आणि मावळ हे पुण्यातले तर कर्जत, उरण आणि पनवेल हे रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाचा यात समावेश आहे. यात चिंचवडमध्ये भाजपच्या अश्विनी जगताप, पनवेलमध्ये भाजपचे प्रशांत ठाकूर, उरणमध्ये अपक्ष निवडून आलेले मात्र भाजप संलग्न असणारे महेश बालदी तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे पिंपरीत अण्णा बनसोडे, मावळमध्ये सुनील शेळके आणि कर्जतमध्ये शिंदेंच्या शिवसेनेचे महेंद्र थोरवे हे विधानसभेचे नेतृत्व करतात. भाजपचे तीन, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन आणि शिंदेंच्या शिवसेनेचा एक असं आमदारांचं पक्षीय बलाबल आहे. हे पाहता कागदावर तरी महाविकासआघाडीची ताकद अतिशय कमकुवत आहे. मात्र गावकी-भावकी, पाहुणे-रावळे या गोतावळ्यांचं राजकारण या मतदारसंघात महत्वपुर्ण ठरतं. गेल्या लोकसभेत मोदी लाटेसोबत बारणेंना हा फॅक्टर ही फायद्याचा ठरला होता. बाहेरचा उमेदवार आमच्यावर लादू नये, ही आग्रही भूमिका तेंव्हा या गोतावळ्याच्या राजकारण्यांनी घेतली होती. म्हणूनचं पवार कुटुंबाला राजकारणाच्या पटलावर पहिला-वहिला पराभव चाखावा लागला होता. या ऐतिहासिक विजयाचे मानकरी ठरलेले श्रीरंग बारणे खासदार झाल्यापासून या गोतावळ्यातील प्रत्येकाच्या अपेक्षांवर उतरलेत का? ते त्यांना अपेक्षित वेळ देऊ शकलेत का? याचं उत्तर त्यांना मतांच्या रुपात मिळणार आहे. आता हाच गोतावळा संजोग वाघेरेंना ही मानणारा आहे आणि त्यांना आपलेसं करण्यासाठी त्यांनी जंगजंग पछाडायला सुरुवात केलीये. वाघेरेंचा स्वभाव मितभाषी आहे. जिभेवर आणि पोटात साखरेचा कारखाना घेऊन फिरणाऱ्या वाघेरेंच्या डोक्यातलं राजकीय गणित सत्यात उतरलं तर त्यांची खासदारकी दूर नाही. पण डोक्यात आखलेलं गणित प्रत्यक्ष डावपेचातुन मांडताना लागणार कस ते पेलू शकतील का? लोकसभेच्या निकालातूनचं ते स्पष्ट होईल.

# सावित्रीबाई फुले पुणे प्राध्यापक भरती प्रक्रिया लांबणीवर

## अर्जांसाठी १६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या १११ पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या प्रक्रियेत सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अध्यादेशाच्या अंमलबजावणीसाठी त्यात काही दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे प्राध्यापक भरतीसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून. उमेदवारांना येत्या १६ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया काही दिवस लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.विद्यापीठाने प्राध्यापक भरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू करून अर्जासाठी ३० जानेवारीपर्यंतची मुदत दिली होती. मात्र राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून २५ जानेवारीला समांतर आरक्षणासंदर्भातील




अध्यादेश प्रसिद्ध करण्यात आला. समांतर आरक्षणामध्ये ३० टक्के महिला आरक्षण, ४ टक्के दिव्यांग, ५ टक्के खेळाडू आदी आरक्षणाबाबत स्पष्टता आहे. त्यानुसार भरती करताना सामाजिक आणि समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या भरती प्रक्रियेत सामाजिक आणि समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करावी लागणार असल्याने काही बदल करावे लागणार आहेत. त्यामुळे भरती प्रक्रियेत उमेदवारांना अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. आता उमेदवारांना १६ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे, तर अर्जाची प्रत २९ फेब्रुवारीपर्यंत सादर करता येणार असल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. त्यामुळे भरती प्रक्रिया पुन्हा काही दिवस लांबणीवर पडल्याचे दिसून येत आहे.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या १११ पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या प्रक्रियेत सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अध्यादेशाच्या अंमलबजावणीसाठी त्यात काही दुरुस्ती करण्यात आली आहे. उमेदवारांना येत्या १६ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे.